REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019


# मानवाधिकार आणि महिला

**डॉ.सचिन गौतम इंगळे[1] , डॉ. पुष्पांजली सचिन इंगळे [2]**
**[1](M.A. M.Ed., M.Phil., Ph.D., NET-SET)**
**सहाय्यक प्राध्यापक सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.**
**[2](M.Sc., M.Ed., Ph.D., NET-SET)**
**सहाय्यक प्राध्यापक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर ( एम.एड विभाग )**

## संशोधन विषय विवेचन

'सर्वे भवन्तु सुखिनः' या उक्तीप्रमाणे सर्वांच्या मनामध्ये इतरांबद्दल चांगली भावना असली पहिजे. मानवी जीवनात हक्काना महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी हक्क आवश्यक असतात. जगात मानवी समूहामध्ये विविध धर्म, जाती, भाषा, वंश, स्त्री-पुरुष रंग आढळतात. माणसाना वैभव संपन्नता प्राप्तीसाठी असलेले भेद अडथळे ठरतात, माणसांसमोर मानवी कल्याण हेच एकमेव उद्दिष्ट असते.

हे विश्वची माझे घर **वसुधैव कुटुंबकम'** असा व्यापक दृष्टीकोन वृध्दिंगत व्हावा या दृष्टीने मानवी हक्कांचे अनन्य साधारण महत्त्व आहे.




**मूख्य मुद्दे. मानवाधिकार, महिला मानवाधिकार, कायदे**

## मानवाधिकाराची संकल्पना :

मानव अधिकार म्हणजे जीवन, स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा यांच्या संबंधातील घटनेने संरक्षित केलेले आंतरराष्ट्रीय करार व भारतीय न्यायालयाकडून मूर्त कलेले हक्क होय. **एस. के. अवस्थी व आर. पी. कटारिया.**

एकूणच माणूस म्हणून जन्माला आल्यावर माणसाला जे नौसर्गिक अधिकार प्राप्त होतात त्यांना मानवी हक्क म्हटले जाते. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी येथे स्विकारलेल्या मानवाधिकाराच्या वैश्विक घोषणापत्राला १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीय विधेयक म्हणून मान्यता मिळाली. या घोषणापत्रात एकूण ३० कलमे आहेत. या कलमांमध्ये दिलेले सर्व हक्क म्हणजे मानवी हक्क होय.

## मानवाधिकार आणि महिला :

**'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी'** असे असताना देखील आज २१ व्या शतकात स्त्री-पुरुष हा भेद मानला जातो आहे. आजही स्त्री-पुरुष समानता हे मूल्य रुजवणे ही आजच्या काळाची गरज आहे.

घटनेच्या १४ व्या कलमानुसार समानतेचा अधिकार देण्यात आला. स्त्री व पुरुष ही दोन चाके तेवढीच सक्षम असल्याशिवाय धावू शकणार नाही. आपल्या समाजव्यवस्थेमुळे व अंधश्रद्धेमुळे आजही महिलांच्या सक्षमीकरणात अडथळे येत आहेत. समाजाची जडणघडण उत्तम निरोगी राहण्यासाठी महिला सबलीकरणाची आवश्यकता आहे. महिलांना मानवाधिकाराची, त्यांच्या हक्कांची जाणीव करून दयायची असेल तर महिलांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे.

भारतात १९९५ साली अमृतसर येथे मानवाधिकाराच्या संदर्भात एक जागतिक परिषद घेण्यात आली. त्यात महिलांच्या सक्षमीकरणावर अधिक लक्ष्य केंद्रित करण्यात आले होते त्यानुसार १९९९ साली संसदीय कायद्यांतर्गत देशपातळीवर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.

**मानवाधिकार परिषदेने स्त्री विषयक मानवाधिकार पुढील प्रमाणे सांगितले आहे.**

१) सर्व क्षेत्रातील मानव अधिकारांच्या बाबतीत स्त्रियांना समान व पुर्ण अधिकार मिळाले पाहिजे. याकरिता संयुक्त राष्ट्र व प्रत्येक देशाच्या शासनाने प्राधान्य दिले पाहिजे.

२) स्त्रियांना समान दर्जा दिला पाहिजे व सापत्नी भावाचे निष्कासन केले पाहिजे,

३) लैंगिक छळ, शोषण व स्त्रियांची अडवणूक या सर्व बाबींचे तसेच लिंगभेदाचेही निष्कासन झाले पाहिजे

४) सर्व प्रकारच्या कार्यक्षेत्रामध्ये स्त्रियांचा सहभाग परिणामकारक होण्याच्या दृष्टिने त्यांना समर्थ बनविण्यासाठी आवश्यक माहितीचा प्रसार करणे.

५) स्त्रियांना त्यांच्या संपूर्ण आयुष्यात उच्च दर्जाच्या मानसिक व शारीरिक आरोग्याची हमी किंवा शाश्वती मिळाली पाहिजे,

६) शिक्षणाच्या सर्वच स्तरावर स्त्रियांना समान संधीची हमी मिळाली पाहिजे.

७) निर्णय घेण्याच्या सर्वच क्षेत्रामध्ये स्त्रियांना प्रवेश मिळाला पाहिजे.

२००१ च्या जगनगनेनुसार महाराष्ट्राच्या ९.६७ कोटी लोकसंख्येपैकी ५.०३ कोटी पुरुष तर ४.८४ कोटी महिला आहेत. म्हणजेच १९ लाखांनी महिलांची संख्या कमी आहे. साक्षरतेचे प्रमाण पुरुष ८६.२७% महिला ६७.४१% एकूण ७७.२७% मुलीचे गळतीचे प्रमाण इयत्ता पहिली ते चौथी १४ % पहिली ते आठवी ३८%, पहिली से दहावी ५४% - शिक्षिकांचे प्रमाण प्राथमिक ४४% तर माध्यमिक ३२% एवढे आहे. त्याचप्रमाणे राज्यातील मुलींचा घटता पुढीलप्रमाणे:

| जिल्हा | दर हजारी जन्मणाऱ्या मुली |
|---|---|
| कोल्हापूर | ७९५ |
| सोलापूर | 845 |
| सातारा | 848 |
| सांगली | ८७६ |
| बीड | ८३६ |
| अहमदनगर | ८६९ |
| | |

म्हणजेच दर हजारी मुलींचा जन्मदर ९१३ इनका आहे स्त्री लोकसंख्येचे घटते प्रमाण ही निश्चित वि चिंतेची व चिंतनाची बाब आहे. पश्चिम महाराष्ट्रात हे प्रमाण जास्त असून त्या पार्श्वभूमीवर १६ ते ३१ डिसेंबर २००७ या कालावधीत स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंधासाठी जनजागरण पंधरवडा आयोजित करण्यात आला होता.

**● भारतात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या हिशोबाचे वर्णन करावयाचे झाल्यास ते पुढील प्रमाणे करता येईल.**

| | | |
|---|---|---|
| 1. | दर 27 दर मिनिटाला | १ विनयभंग |
| 2. | दर ३३ मिनिटाला | १ स्त्री कुर वर्तन |
| 3. | दर 43 मिनिटाला | 1 अपहरण |
| 4. | दर 54 मिनिटाला | 1 बलात्कार |
| 5. | दर २ तासाला | 1 हुंडाबळी |

वरील आकडेवारीवरून स्त्रियांना आजही माणूस म्हणून वागवले जात नाही असे दिसून येते.

**स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त होण्यासाठी शासनाने मुलींसाठी काही विशेष कार्यक्रम तयार केले आहेत ते पुढील प्रमाणे**

१) राज्यात बारावी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण

२) मुलींच्या उपस्थितीसाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या शाळांना २ लाखाचे अनुदान (बांधकामासाठी)

३) शाळेचे फर्निचर, वाचनालय व्यवसाय प्रशिक्षण, क्रीडा साहित्यासाठी ३० हजारांचे अनुदान.

४) व्यक्तीमत्व विकास शिबिर व्यवसाय प्रशिक्षण किशोरी मेळावे घेण्यासाठी २० हजाराचे अनुदान.

५) आदर्श शाळांना ५ हजारांचे विशेष पारितोषिक.

६) बालचिकित्सा केंद्रासाठी ६ हजाराचे अनुदान

७) लहान मुलींचे आरोग्य तपासणी आणि उपचार

८) मुलींना पोषण आहार

९) शाळांना विविध कार्यक्रमासाठी ३५ हजारांचे अनुदान

१९९४ मध्ये महाराष्ट्राने देशात महिला धोरण जाहिर करणारे पहिले राज्य होण्याचा मान मिळाविला आहे. इ.स २००० मध्ये महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांच्या **शाळेच्या दाखल्यावर वडीलांच्या नावाबरोबर आईचेही नाव लावण्याची सक्ती केली**. ३ जानेवारी हा सावित्रीबाई फुले यांचा जन्म दिवस 'भारतीय स्त्री मुक्ती दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

**राष्ट्राच्या विकासात महिलांचे महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेऊन भारत सरकारने २००१ हे वर्ष 'महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित केले. त्यामध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत:**

१) स्त्री केंद्री नियोजन

२) महिला विशेष घटक योजना, राज्य महिला कोषची स्थापना

३) ग्रामविकास नगरविकासात महिलांना स्थान

४) विविध क्षेत्रांत महिलांना प्रतिनिधित्व

५) महिलांचा आर्थिक विकास

६) महिलांसाठी आरोग्य विषयक व शिक्षणविषयक विविध उपक्रम

७) संरक्षणात्म दृष्टिकोन

महिलाना अधिकार प्रदान करणारे व त्याचा अधिकाराचे संरक्षण करणारे कायदे व धोरणे याची महिला मानवी हक्क मिळण्यात महत्वाची भूमिका आहे.

**महिलांसाठीचे विविध कायदे पुढीलप्रमाणे :**

१) घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा (२००६)

२) सतिप्रथा निवारण कायदा (१९८७)

३) हुंडाबंदी कायदा (१९५६)

४) मातृत्व लाभ कायदा (१९६१)

५) अनैतिक व्यापार कायदा (१९५६)
६) बाळंतपणपूर्व निदान तंत्रज्ञान कायदा (१९९४)
७) हिंदू विवाह कायदा(१९५५)
8) भारतीय घटस्फोट कायदा (१९६९)
९) हिंदू वारसा हक्क कायदा(१९५६)
१०) बालविवाह नियंत्रण कायदा (१९२९)
११) कुटुंब न्यायालय कायदा (१९८४)
१२) समान वेतन कायदा (१९७६)
(१३) बलात्कारा विषयीचा कायदा

असे विविध कायदे महिलांच्या संरक्षणासाठी करून सबलीकरणाच्या दिशेने पावले उचलली गेली तसेच महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनातर्फे विविध व नवनवीन योजना तयार करुन पाठबळ दिले जात आहे.

**महिलांच्या शिक्षणासाठी शासनाच्या विविध योजना पुढील प्रमाणे :**

**१) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य**

अ) दुर्बल घटकातील मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता
ब) अहिल्यादेवी होळकर मुलींना मोफत प्रवास योजना
क) महिला सैनिक शाळा
ड) इ. १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण

**२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन**

अ) सावित्रीबाई फुले कल्याण योजना
ब) शासकीय तंत्रनिकेतनात मुलींसाठी वसतीगृह बांधणे
क) महिला महाविद्यालये ड) महिला विद्यापीठे

**३) उच्च व तंत्र विभाग, महाराष्ट्र शासन**

अ) प्रियदर्शनी वसतीगृहे
ब) व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन

**४) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभाग यांच्या मार्फत मुलींच्या शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना.**

अ) इ. ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती विमुक्त जाती. भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींकरिता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना
ब) आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींकरिता शासकीय वसतीगृहे क) मागासवर्गीय मुलीकरिता शासकीय वसतीगृह

**५) जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास समितीतर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना**

अ) शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकली पुरविणे
व) शाळेत जाणाऱ्या मुलींना गणवेश वाटप करण्याची योजना
क) बालिका समृध्दी योजना

### ६) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

### अ) सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना

महिलाचा दर्जा उंचावण्यसाठी आणि सबलीकरणासाठी शासन स्तरावरून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे विविध नियम, योजना, कायदे बदलणे सुरु आहे परंतु नुसते कायदे व योजना करून अपेक्षित बदल घडणे शक्य होत नाही. त्यासाठी आज विविध उपायाची सुध्दा गरज आहे.

### महिला सबलीकरणासाठी उपाय

१) महिलांना मिळणाऱ्या मानवी हक्काविषयी जाणीव निर्माण करणे

२) महिलांना व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करणे

३) कुटुंबातून महिलांना प्रोत्साहन यावे.

४) पुरुषप्रधान संस्कृती विचारसरणीत बदल करणे.

५) प्रशासनात महिलांचे प्रमाण वाढवावे.

६) सर्व महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.

७) महिलामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

८) आरक्षणाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.

9) अन्याय, अत्याचाराला विरोध करण्याचे सामर्थ्य तिच्यांत निर्माण करावे.

१०) महिलांना कायद्याचे ज्ञान याव.

११) महिला ग्रामसभेत त्यांचा सहभाग वाढवावा.

१२) महिलावर होणाऱ्या अत्याचारासाठी गुन्हेगारास कठोर शिक्षेची कारवाई करावी.

आजही एकटचा महाराष्ट्र राज्याचा विचार करता शासनाच्या विविध योजना व कायदे असूनही महिलांवर होणाऱ्या अत्याचारापैकी सर्वाधिक गुन्हे मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, ठाणे, जळगाव, बीड या जिल्ह्यामध्ये होतात ह्या गुन्ह्यांमध्ये सतत वाढच होत आहे असे दिसते.

केवळ महिलादिन, मातृदिन साजरे करून हे होणार नाही तर आपण ज्या समाजात राहतो त्या समाजातील महिलांना हक्काबद्दल जागृती करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे. महिलांना समाजात एक आदरयुक्त दर्जा प्राप्त करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे. व हे प्रयत्न सर्व स्तरांवर होणे अपेक्षित आहे. महिलांच्या दर्जात सुधारणा करणारे हे कायदे व उपक्रम तेव्हाच महत्वाचे ठरतीत जेव्हा महिलांच्या प्रति असणारा दृष्टीकोण बदलेल. या प्रयत्नांबरोबरच महिलानी देखील स्वतःचे स्वतंत्र व्यक्तीमत्व घडविले पाहिजे, असुरक्षितता परावलंबन व न्युनत्याची भावना न ठेवता अन्यायाला विरोध, आत्मनिर्भरता, स्वयंपूर्णता यांची जोपासना करायला हवी. असे झाले तरच महिलांना मानवाधिकार खऱ्या अर्थाने मिळाले असे म्हणता येईल.

### संदर्भ ग्रंथ सूची

1) Agrwal R.S. (1994) Human Rights In The Modern World, Chetana Publication, New Delhi.

2) Basu D.D. Human Rights In Constitutional Lasy, Prentice Hall of India.

3) www. pdhre. Org

4) www.wikipedia.org.

5) शिक्षण संक्रमण

6) दे सकाळ

7) योजना (2011), माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, दिल्ली

8) कांबळे उध्दव : मानवी हक्क आणि दिशामूल, साकेत प्रकाशन स्टेशन रोड, औरंगाबाद,

9) भारतीय मानव अधिकार संस्थान, नई दिल्ली